# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.)

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८ अन्वये दाखल केलेली तक्रार**

**क्र.रामाआ नाशिक/तक्रार क्र.१२१/२०२३/नाशिक**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री.गोरख शंकर आहेर, रा.एन-४२/व्हीडी-१/२५/३, सावता नगर, अष्टविनायक चौक, सिडको, नाशिक ४२२००८. | तलाठी, तलाठी कार्यालय, देवळा. ता.देवळा, जि.नाशिक. | -- |

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

**तक्रार सुनावणी दिनांक २३/०२/२०२४**

तक्रारदार यांनी दि.२५/०१/२०२३ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रारीच्या सुनावणीसाठी तक्रारदार उपस्थित असून जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

२. तक्रारदार यांनी त्यांच्या दि.२५/०१/२०२३ रोजीच्या तक्रार अर्जात असे नमूद केले आहे की, आयोगाच्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी तथा तलाठी, देवळा यांनी अद्याप माहिती दिलेली नसून माहिती देण्यास टाळाटाळ केली आहे. तरी त्यांच्याविरुध्द योग्य ती कारवाई करावी ही विनंती.

३. आयोगाने द्वितीय अपिल क्र.२३१८,२३१९ व २३२०/२०१९/नाशिक संदर्भात दि.०१/०८/२०२२ रोजी झालेल्या सुनावणीत "विद्यमान जन माहिती अधिकारी तथा तलाठी, तलाठी कार्यालय, देवळा यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आंत अपिलार्थीस त्यांच्या दि.१९/०३/२०१९ रोजीच्या तीनही माहिती अर्जान्वये मागितलेल्या माहितीसंदर्भात नोंदणीकृत पोचदेय डाकेने पत्र पाठवून उपलब्ध कागदपत्रांच्या समक्ष अवलोकनासाठी १५ दिवसांच्या आंतील तारीख व वेळ कळवावी. अवलोकनानंतर अपिलार्थीस त्यातील कागदपत्रांच्या काही प्रती हव्या असल्यास तशी यादी घेऊन विनामूल्य माहिती पुरवावी. जर सदर अभिलेख उपलब्ध होत नसल्यास महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ च्या कायद्यान्वये अभिलेख गहाळ प्रकरणी कार्यवाही करण्यात यावी" असे आदेश पारित केले आहेत.

४. आज सुनावणीवेळी जन माहिती अधिकारी हे अनुपस्थित असल्यामुळे त्यांनी आयोगाच्या वर नमूद आदेशानुसार तक्रारदार यांना उपलब्ध कागदपत्रांच्या अवलोकनासाठी बोलावून माहिती उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही उलगडा झाला नाही. तसेच आयोगाच्या दि.१३/०२/२०२३ च्या पत्रान्वये याप्रकरणी जन माहिती अधिकारी यांचेकडून अहवाल मागविण्यात आला असून तो देखील आयोगास अद्याप प्राप्त झालेला नाही. तथापि तक्रारदार यांनी आयोगासमोर असे नमूद केले की, आयोगाच्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अद्यापपर्यंत अवलोकनाबाबत कोणताही पत्रव्यवहार केला नाही किंवा अभिलेख उपलब्ध नसल्यास त्याबाबत महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ च्या कायद्यानुसार अभिलेख गहाळ प्रकरणी कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

सबब, सदर प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा तलाठी, तलाठी कार्यालय, देवळा ता.देवळा, जि.नाशिक यांनी आयोगाचे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आंत आयोगाने द्वितीय अपिल क्र.२३१८,२३१९ व २३२०/२०१९/नाशिक संदर्भात दि.०१/०८/२०२२ रोजी झालेल्या सुनावणीत दिलेल्या आदेशांतील मुद्दा क्र.१ ची अंमलबजावणी करावी.

२. आयोगाने द्वितीय अपिल क्र. २३१८,२३१९ व २३२०/२०१९/नाशिक संदर्भात दि.०१/०८/२०२२ रोजी झालेल्या सुनावणीत दिलेल्या आदेशांतील मुद्दा क्र.१ ची अंमलबजावणी केली नाही म्हणून त्यांच्याविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० (१) नुसार शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा दि.०१/०८/२०२२ रोजी कार्यरत असणारे जन माहिती अधिकारी तथा तलाठी, तलाठी कार्यालय, देवळा ता.देवळा, जि.नाशिक यांनी आयोगाचे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आंत आयोगाकडे सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा लेखी खुलासा प्राप्त न झाल्यास याप्रकरणी त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहित धरुन शास्तीची कार्यवाही कायम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

३. आयोगाकडे आज सुनावणीवेळी तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी तथा तलाठी, तलाठी कार्यालय, देवळा ता.देवळा, जि.नाशिक अनुपस्थित होते. त्यामुळे सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०१५/प्र.क्र.२२२/१५/सहा, दि.०१/१२/२०१५ नुसार त्यांच्याविरुध्द कार्यवाही का करण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा आयोगाचे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आंत आयोगाकडे सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा लेखी खुलासा प्राप्त न झाल्यास त्यांचे याप्रकरणी काहीही म्हणणे नाही असे गृहित धरुन त्यांच्याविरुध्द वरील परिपत्रकानुसार कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

४. वरील निर्देशांसह प्रस्तुत तक्रार क्र.१२१/२०२३/नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

(राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक)

**( भूपेन्द्र गुरव )**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

स्थळ :- नाशिक
दिनांक :-

जावक क्र. आ.९५५e    दिनांक :- ०८/०६/२०२४

---

**प्रत :- माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.**

**तहसिलदार, तहसिल कार्यालय, देवळा ता.देवळा, जि.नाशिक.**

यांना आदेशित करण्यात येते की, आयोगाच्या निर्णयाची एक प्रत संबंधितांना बजावून आयोगाकडे विहित मुदतीत लेखी खुलासा सादर करण्याबाबत आपल्या स्तरावरुन सूचित करण्यात यावे.